Wednesday, February 25, 2009

**Country's all four metros says 'No Smoking'**

Publication: Prahar, Edition: Mumbai, Journalist: PTI, Page No: 1

# देशातील चारही महानगरे म्हणतात




**नवी दिल्ली :** धूम्रपानविरोधी मोहिमेमुळे प्रशंसा आणि टीकेलाही सामोरे जावे लागलेले केंद्रीय आरोग्यमंत्री अंबुमणी रामदौस यांच्यासाठी एक आनंदाची बातमी नुकतीच जाहीर झाली आहे. रामदौस यांच्या धूम्रपानविरोधी अभियानाला देशातील प्रमुख चार महानगरांत जवळजवळ १०० टक्के पाठिंबा मिळाला आहे.

सार्वजनिक ठिकाण, कार्यालय, रेस्टॉरंट, बार येथे धूम्रपान करण्यावरील बंदीला मुंबई, दिल्ली, कोलकाता व चेन्नई या महानगरांतील ९८ टक्के लोकांनी पाठिंबा दर्शवला आहे. व्हॉलंटरी हेल्थ असोसिएशन ऑफ इंडिया (व्हीएचएआय) आणि हीलिस सेखसरिया इन्स्टिट्यूट फॉर पब्लिक हेल्थ यांनी याबाबत केलेल्या सर्वेक्षणात हे आढळून आले आहे. या चार महानगरांत ८ ते २३ डिसेंबर २००८ दरम्यान १५ ते ६४ वर्षे वयोगटातील एक हजार २६ जणांनी आपले मत या सर्वेक्षणात नोंदवले.

सार्वजनिक ठिकाणी धूम्रपानास बंदी घालण्यासाठी सरकारने नवा कायदा अमलात आणला पाहिजे, असे मत ९९ टक्के जणांनी नोंदवले; तर धूम्रपान करणाऱ्यांच्या सान्निध्यात येणाऱ्यांवरही घातक परिणाम होतात, असे मत ९२ टक्के लोकांनी व्यक्त केले. देशाला धूम्रपानमुक्त करण्यासाठी विधेयक आणावे, असा संदेश या सर्वेक्षणातून मिळतो, असे मत व्हीएचएआयने व्यक्त केले आहे. आरोग्य मंत्रालयाने २ ऑक्टोबर २००८ रोजी सार्वजनिक ठिकाणी धूम्रपानावर बंदी घातली होती. त्यानंतर उपाहारगृहे, बारमध्ये बसणे अधिक सुसह्य झाले असल्याचे मत ८५ टक्के जणांनी नोंदवले आहे. (पीटीआय)